# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक ११/०४/२०१९

संपुर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या तसेच गडचिरोली पोलीसांसमोर मोठे आव्हान असलेल्या नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०१९ ची मतदान प्रक्रिया आज रोजी शांततेत पार पडली. दिनांक १०/०४/२०१९ रोजी पासून गडचिरोली जिल्हयात मोठया प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. नक्षलवादयांनी मतदारांना भिती दाखविण्यासाठी बॅनरबाजी करत मतदान न करण्याचे आवाहन केले होते. परंतू याला न जुमानता गडचिरोली जिल्हयातील दुर्गम भागातील आदिवासी बांधवांनी नक्षलवादयांनी लावलेले बॅनर काढून त्याची जाळपोळ करत मतदान करुन लोकशाही बळकट करण्याचा निर्धार केला. गडचिरोलीतील नागरीक व गडचिरोली पोलीस दलाने लावलेला चोख बंदोबस्त यामुळे संपुर्ण गडचिरोली जिल्हयात माओवादयांवर वर्चस्व ठेवत मोठया प्रमाणावर नागरिकांनी घराबाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावला. विदर्भांत आज झालेल्या मतदान प्रक्रियेत सर्वाधीक म्हणजे ६१.३३ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

माओवादयांनी घातपाताच्या उद्देशाने ठिकठिकाणी भुसुरुंग पेरुन ठेवले होते. दिनांक १०/०४/२०१९ रोजी पोमकें गट्टा (जां) हद्दीतील वटेली बुथ येथे पोलीस पार्टी जात असतांना दुपारी १५.२० वा. सुमारास भुसुरुंगचा स्फोट होउन सिआरपीएफ चे दोन जवान जखमी झाले होते. आज दिनांक ११/०४/२०१९ रोजी उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या उपपोस्टे कसनसुर हद्दीतील वाघेझरी येथे सकाळी ११.०० ते ११.३० वा.चे दरम्यान भुसुरुंगचा स्फोट माओवादयांनी घडवून आणला. परंतु यात कोणतीही हानी झाली नाही. तसेच आज रोजी १५.३० वा. दरम्यान पोमकें गट्टा (जां.) हद्दीतील मौजा टिटोळा येथे नक्षलवादयांनी घातपाताच्या दृष्टीने पेरुन ठवेलेले ०४ भुसुरुंग निकामी करण्यात पोलीस दलास यश आल्याने मोठी हानी टळली. त्यानंतर १५.३० वा. दरम्यान पोमकें हेडरी हद्दीतील पुरसलगोंदी गावाजवळ भुसुरुंगचा स्फोट होवुन गडचिरोली पोलीस दलातील ०२ जवान जखमी झाले असुन जखमींवर पुढील उपचार सुरु असून सर्व जखमी जवानांची प्रकृती स्थिर आहे.

गडचिरोली पोलीस दलाने अथक परिश्रम घेत नक्षलवादयांचे मनसुबे उधळवून लावत लोकसभा निवडणुक २०१९ ची मतदानप्रकिया शांततेत पार पाडली आहे. यामुळे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले आहे.

–